REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १९ जून, १९४० | अंक २५

## Deccan Institute of Commerce Poona

( Recognised by Government )

Opens for the 1940-41 Session on Tuesday the 25th June 1940. Students admitted for L. C. C., G. C. C. and D. Com. ( I. M. C. ) Examinations in Accountancy, Banking, Insurance, Secretarial Work and Practice, Shorthand, Typewriting etc. Efficient and qualified staff. Prospectus free on application to :

Secretary,

592/3 Budhwar Peth,
Opp. New English School,
Poona.

## The Willingdon College, Sangli.

Reopens for the new academic year on the 20th June. Registration of names will commence on the 6th June. The college provides for both Arts and Science Courses in the first two years, for B. A. Degree courses, Pass and Honours, and for post-graduate instruction. About a hundred seats are available in the college Hostels. Healthy surroundings, inexpensiveness and efficiency are the special features of the college.

The tuition fees are Rs. 60 per term, and the room rent per term is Rs. 12 for a double room and Rs. 15 for a single room. Boarding charges come to about Rs. 12 p. m. Further information can be had on application.

Separate accommodation for lady students is available in the Sakhubai Gokhale Hostel on the college premises.

V. K. GOKAK,
Principal.

## आयुर्वेद महाविद्यालय, पुणें

### नवीन वर्षाचे वर्ग गुरुवार ता. २० पासून सुरूं होतील.

कोणत्याही विद्यापीठाची प्रवेश परीक्षा ( Matriculation ) संस्कृत व इंग्रजी हे विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश मिळेल. मुंबई सरकारच्या देशी वैद्यक बोर्डानें मान्य केल्याप्रमाणें अभ्यासक्रम ५ वर्षांचा. प्रत्यक्ष शिक्षणाच्या सोयी खालील प्रमाणें आहेत.

१. पदार्थविज्ञान, रसायन व इंद्रिय-विज्ञान यांचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां **प्रयोगशाळा**.

२. शरीर ( Anatomy ) या विषयाचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां **शवविच्छेदनशाला व शारीर वस्तुसंग्रह** ( Museum )

३. औषधी तयार करण्याचे प्रत्यक्ष शिक्षणाकरितां **रसशाळा पुणें, लि.** हा औषधांचा कारखाना.

४. रोगनिदान व चिकित्सा ( काय व शल्य ) यांचे प्रत्यक्ष शिक्षणाकरतां ६५ रहात्या रोग्यांची व उत्तम शस्त्रकर्म मंदिराची सोय असलेलें प्रसिद्ध **ताराचंद रामनाथ धर्मार्थ आयुर्वेदीय हॉस्पिटल**.

५. प्रसूति तंत्राच्या शिक्षणाकरितां १२ सूतिकेची सोय असलेलें स्वतंत्र **प्रसूति गृह**.

६. याशिवाय हॉस्पिटलला जोडून **क्ष किरणशाखा** ( X Ray Dept. ) **संप्राप्ति विज्ञान शाला** ( Pathologic Laboratory ) यांची सोय केली आहे.

फी, अभ्यासक्रम, प्रवेश अर्ज वगैरे सविस्तर माहितीसाठीं दीड आण्यांचीं तिकिटें पाठवून माहितीपत्रक मागवावें. मर्यादित विद्यार्थ्यांची वसतिगृहाची सोय केलेली आहे. प्रथम वर्षांत मर्यादित संख्या गुणानुसार घेणें असल्यानें प्रवेशेच्छु विद्यार्थ्यांनीं छापील नमुन्यावर शक्य तो लवकर अर्ज करावेत. प्रवेश अर्ज ता. ५ जूनपासून २० जूनपर्यंत महाविद्यालयाचे कचेरीचे वेळीं घेण्यांत येतील.

पत्ताः—आयुर्वेदीय महाविद्यालय, २२ निहाल पेठ, पुणें.

वा. चिं. लागू,
अधिपति.

# विविध माहिती

### कागदापेवजी पाट्या

कागदाच्या तुटवड्यामुळें इंग्लंडमधील शाळांतून कागदाचे जागीं स्लेटपाट्यांचा उपयोग पुनः सुरू झाला आहे.

### हॉलंडच्या राणीचें देशांतर

हॉलंडची राणी विल्हेमिना ही हॉलंड सोडून इंग्लंडकडे येण्याचें कारण असें सांगतात, कीं तिची कन्या प्रिन्सेस ज्यूलिआना हिचें बाळंतपण जवळ आलें होतें परंतु ती आपल्या आईस संकटाचे ठिकाणीं सोडून जाण्यास तयार नव्हती. युद्धाचें घेन्यांत आपल्या कन्येस राहूं देण्यापेक्षा तिचेबरोबर स्वतःच बाहेर जाण्याचें असेर राणीनें ठरविलें.

### मि. डी व्हॅलेरा व मि. चर्चिल

मि. डी व्हॅलेरा ह्यांनीं मि. चर्चिल हे ग्रेटब्रिटनचे मुख्य प्रधान झाले त्यावेळीं अभिनंदनपर संदेश पाठविला नाहीं. मि. चर्चिल ह्यांनीं मात्र ग्रेटब्रिटन आणि आयर्लंड ह्यांमध्यें सलोखा राहील असा विश्वास प्रकट करणारा संदेश त्यांस धाडला. ब्रिटिश साम्राज्य आणि आयर्लंडचें स्थान ह्यांचा उल्लेख टाळण्यांत आला. आयर्लंड हा ब्रिटिश साम्राज्यांतील एक देश आहे, हें मि. डी व्हॅलेरा ह्यांस मान्य नाहीं.

### दारूबंदी बेकायदा!

मुंबई शहरांत दारूबंदी अंमलांत आणणारा सरकारी जाहीरनामा बेकायदा ठरला. त्यास कायदेशीरपणा प्राप्त करून देण्यासाठी एक 'गव्हर्नर्स ॲक्ट' जारी करण्यांत आला. ह्या ॲक्ट बेकायदा आहे कीं काय असा प्रश्न मुंबईच्या गिरगांव प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटचे कोर्टात उपस्थित करण्यांत आला, त्याचा खुलासा प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं हायकोर्टाकडून करून घेण्याचें ठरविलें आहे.

### ७९० पैकीं फक्त ८ हजर

ब्रिटिश सरकारतर्फे युद्ध-परिस्थितीवर लार्डांच्या सभेस एक पत्रक नुकतेंच सादर करण्यांत यावयाचें होतें त्या वेळीं ७९० सभासद्-लॉर्डांपैकीं फक्त ८ हजर राहिले. तथापि, त्यांसाहि फार वेळ थांबावें लागलें नाहीं, कारण अपेक्षित पत्रक त्यावेळीं सादर करण्यांत आलें नाहीं.

### इटालियन वकील परत जाणार

मुंबई येथील इटालियन सरकारच्या वकिलानें आपल्या कामाचा चार्ज स्पॅनिश वकिलास दिला आहे.

### शत्रुपक्षीय मालाच्या जाहिराती

शत्रुपक्षीयांच्या देशांत तयार झालेल्या मालाचे जाहिरातीवर हिंदुस्थान सरकारनें नियंत्रण घातलें आहे. शत्रुपक्षीयांच्या मालावर नियंत्रण ठेवणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांकडून तो खरेदी केलेला आहे अगर तो जाहिरातदाराजवळ युद्ध सुरू होण्यापूर्वीपासून होता, हें जाहिरातींत स्पष्ट करण्यांत आलें पाहिजे. ह्या स्पष्टीकरणास जाहिरातींत प्राधान्य देणें आवश्यक आहे.

### चर्चमधील घंटांचा उपयोग

आकाशांतून उतरणाऱ्या सैनिकांसंबंधी इशारा देण्यासाठीच फक्त ग्रेट ब्रिटनमधील चर्चेसच्या घंटांचा उपयोग ह्यापुढें केला जावयाचा आहे.

### ॲबिसिनियामधील हिंदी लोक

ॲबिसिनियामध्यें आतां फक्त ५० हिंदी लोक शिल्लक आहेत. इटलीनें ॲबिसिनिया घेतला, त्यावेळीं बाकीचे निघून आले. परंतु आपले पैसे बाहेर नेण्याच्या प्रतिबंधामुळें कांहीं लोकांस तेथेंच रहावें लागलें.

### येती आय. सी. एस. ची परीक्षा

आय. सी. एस. मध्यें उमेदवारांस दाखल करून घेण्यासाठी त्यांची निवड करण्याकरितां दिल्ली येथें परीक्षा घेण्यांत येईल, तिला प्रारंभ ६ जानेवारी, १९४१ रोजीं होईल. निवडावयाच्या उमेदवारांची संख्या किती, तें मागाहून जाहीर केलें जाईल.

### फिनलंडच्या कर्जाचा हप्ता

फिनलंडच्या अमेरिकेच्या देण्याचा १५ जून, १९४० असेरचा सहामाही हप्ता वसूल न करण्याचें अमेरिकेच्या विधिमंडळांनीं ठरविलें आहे. फिनलंड आतां रशियाचे ताब्यांत आहे.

### बॅरिस्टरीची परीक्षा

१९४० सालांतील बॅरिस्टरीच्या परीक्षेस हिंदुस्थानांतहि बसण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. ज्यांनीं आपला अभ्यासक्रम इंग्लंडमध्यें पुरा केला आहे, तथापि ज्यांस परीक्षेपूर्वी परत हिंदुस्थानांत यावें लागलें, अशांच्या सोईसाठी ही व्यवस्था आहे.

### वानरांची आयात बंद

ब्रिटिश हिंदुस्थानांत वानरें आणण्याची मध्यवर्ती सरकारनें मनाई केलेली आहे.

### म्हैसुरांत आगपेट्यांचा कारखाना

म्हैसूर संस्थानांत आगपेट्यांचा एक कारखाना काढण्यासाठी संयुक्त भांडवलाची कंपनी स्थापण्यास म्हैसूर सरकारनें मंजुरी दिली आहे. ह्या कंपनीचें अधिकृत भांडवल ५ लक्ष रुपये राहील; सरकार ५० हजारांचे भाग घेईल. आगपेट्यांस लागणारें लाकूड सरकार आपल्या जंगलांतून सवलतीच्या दरानें देईल. नऊ डायरेक्टरांपैकी तिघे सरकार नेमील. ह्या तिघांतील एक कंपनीचा अध्यक्ष व मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम करील. सेक्रेटरी आणि जनरल मॅनेजर ह्यांच्या नेमणुकीस सरकारची मंजुरी लागेल. शिमोगा येथील म्हैसूर मॅच मॅन्युफॅक्चरिंग कंपनी लि. ह्या लिक्विडेशनमध्यें गेलेल्या कंपनीची जागा, तिच्या इमारती व यंत्रें ही नवीन कंपनी खरेदी करणार आहे.

### मध्यवर्ती अफू-मंडळाचे पहिले हिंदी अध्यक्ष

राष्ट्रसंघाच्या परमनंट सेंट्रल ओपिअम बोर्डाचे अध्यक्ष म्हणून सर अतुल चतर्जी यांची निवड एकमतानें झाली आहे. या कामीं काम करणारे सरसाहेब हे पहिले हिंदी सदस्य आहेत. युद्धाच्या धामधुमीच्या काळांत अफू व इतर मादक द्रव्यांचा प्रसार वाढूं नये म्हणून तूर्त वरील मंडळाशिवाय इतर दोन समित्याहि डोळ्यांत तेल घालून काम करीत आहेत.

### फ्रान्सला हिंदुस्थानची देणगी

व्हाइसरॉयांनीं हिंदी युद्ध फंडांतून फ्रान्सला ५ लक्ष रुपयांची देणगी दिली आहे.

### प्रार्थना दिन

ता. १६ जून रोजीं फ्रान्समध्यें सर्व चर्चेसमध्यें प्रार्थनेचा दिवस म्हणून पाळण्यांत आला.

### मुलांचें स्थलांतर

लंडन शहर आणि त्याचें उपनगर ह्यांतून मुलांस पश्चिम इंग्लंड, दक्षिण आणि वेल्सकडे पोचविण्याचें काम चालू आहे. चार दिवसांत ७६ हजार मुलें पोचविण्यांत आलीं.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | २९० |
| २ हिंदी बँकांचा योजिलेला कायदा ... | २९१ |
| ३ हिंदी कपाशीच्या बाजारभावाचें नियंत्रण... | २९२ |
| ४ स्फुट विचार ... इटलीचा संधिसाधूपणा—बँकिंगचा कायदा व मराठा चेंबर—कागदाच्या तुटवड्याचा वर्तमानपत्रांवर परिणाम—हॉलंडच्या एशियांतील वसाहती | २९३ |
| ५ बँकिंग नियंत्रण कायद्याचा मसुदा ... | २९५ |
| ६ शिरगणतीचे वेळचे प्रश्न | २९६ |
| ७ राष्ट्रसंघाचें युद्धकालीन कार्य ... | २९६ |
| ८ संरक्षित धंदा आणि किमान दर ... | २९६ |
| ९ मुंबईतील हिंदी ख्रिस्ती समाजाची स्थिति | २९८ |
| १० निवडक बाजारभाव | २९९ |

अर्थ

बुधवार, ता. १९ जून, १९४०

## हिंदी बँकांचा योजिलेला कायदा

### मुख्य कलमांची छाननी

### (२)

आतांपर्यंत बँकिंग संबंधांतील बिलाच्या ७ व्या कलमाचें विवेचन आम्हीं केलें आहे. त्या बाबतींत येथील मराठा चेंबरनें महाराष्ट्रीय बँकांच्या प्रतिनिधींशीं चर्चा करून कोणता अभिप्राय व्यक्त केला आहे त्याचें दिग्दर्शन आजच्या अंकांत स्फुट विचारांत आलें आहे. ठेवीदारांच्या संरक्षणाच्या व विश्वासाच्या आणि बँकांच्या स्थैर्याच्या व कारभाराच्या दृष्टीनें त्या सूचना योग्य आहेत, ह्यांत संशय नाहीं. बिलांत दुसरा एक प्रश्न महत्त्वाचा आहे, तो बँकांनीं रोकड किती ठेवावी आणि किती रकम सरकारी रोख्यांत गुंतवावी ह्याविषयींचा आहे. बँकांचें भरलेलें भांडवल आणि रिझर्व्ह सोडले तर त्यांस कर्जाचे व्यवहार करण्यास लागणारा पैसा ठेवींपासूनच मिळत येत असतो. भांडवल व रिझर्व्ह त्यांच्या मालकीचे असल्यानें तो पैसा त्यांस जरूरीप्रमाणें वापरण्यास निश्चयानें हाताशीं असतो आणि तो परत कोणी मागेल अशी धास्ती नसते. पण इतर पैशाची स्थिति त्याहून अगदीं निराळी असते. मुदतीची ठेव असेल तर ठरलेल्या वेळीं तिचा पैसा परत देण्याची बँकेची तयारी पाहिजे. बिनमुदतीच्या म्हणजे ठेवीदारांच्या इच्छेप्रमाणें परत व्हावयाच्या ठेवींच्या बाबतींत मुदत नसते आणि अमूक वेळीं अमूक रकमेची मागणी येईल ह्याविषयीं शाश्वति असत नाहीं. चालू खात्यांतील ठेव ठेवीदार सबंदच्या सबंद काढून घेऊं शकतो. चालू व सेव्हिंगजच्या ठेवी अर्थात् येतजात असल्यानें त्यांच्या जाण्या-येण्याची कांहीं मर्यादेंत सरासरीनें वजावाट होते. तथापि, नेहमींच्या अनुभवावरून ह्या वजावाटींत किती रकम देण्यासाठी जवळ ठेवावी लागते ह्याची कल्पना प्रत्येक बँकेस आलेली असते आणि तेवढ्यापुरती रोकड ती बाळगते. हा पैसा अर्थातच बिनव्याजी पडून रहातो आणि तो तसा राहूं देण्यांत कोणीहि बँकर खुशाखुशीं तयार होणार नाहीं. तथापि तो रोकडींत असेल तरच त्याचा उपयोग आहे आणि तो बँकेच्या व्यवहाराच्या संरक्षणाचा पाया आहे. ह्या कारणानें रोकड शिल्लक अपरिहार्य आहे असेंच समजलें पाहिजे.

बँकांची रोकड शिल्लक किती असावी ह्याविषयीं मतभेद असूं शकेल. तथापि ती ठेवींच्या विशिष्ट प्रमाणांत असली पाहिजे हें सर्वसंमत आहे. बिनमुदतीच्या ठेवींचे ५ टक्के व मुदतीच्या ठेवींच्या $1\frac{1}{2}$ टक्का हीं प्रमाणें रिझर्व्ह बँकेनें सुचविलीं आहेत आणि तीं सामान्यतः मान्य होतील अशींच आहेत. बँकिंगसंबंधाच्या कायद्याच्या मसुद्यांत १० व्या कलमांत हींच प्रमाणें नमूद आहेत. केव्हांहि काढतां येतील अशा ठेवींच्या बाबतींतलें प्रमाण मोठें आहे ह्याचें कारण उघड आहे आणि त्याचें विवेचन करण्याचें प्रयोजन नाहीं. ह्या प्रमाणांतील शिलकेच्या रकमा किमान अशा समजल्या जातात आणि बँका सामान्यतः सहज हातीं येईल असा पैसा अल्प व्याजानें ठेव म्हणून इतर बँकांत ठेवतात. ही ठेव निवळ रोकडीची जागा घेऊं शकत नाहीं, हें उघडच आहे. ह्यापेक्षा अधिक व्याज मिळून निकडीच्या प्रसंगीं हातीं येईल ह्या रीतीनें पैसा ठेवण्याचा आणखी एक मार्ग म्हटला म्हणजे तो सरकारी कर्जरोख्यांत गुंतवणें हा होय. त्यावर व्याज सुटून अडचणीचे वेळीं तिचें रोकडींत रूपांतर करतां येतें. कर्जावरील व्याजाच्या दराचे मानानें त्या व्याजाचा दर हलका असतो, हें खरें; पण अशी तजवीज करणें बँकेच्या अंतिम सुरक्षिततेच्या दृष्टीनें उपयुक्त असतें. नियोजित कायद्याच्या बिलांत ठेवींच्या ३० टक्के इतक्या किंमतीचे कर्जरोखे किंवा रोकड प्रत्येक बँकेजवळ असली पाहिजे असा निर्बंध घालण्यांत आला आहे. हे रोखे तारण म्हणून कोठेंहि दिलेले असतां कामा नयेत; नाहीं तर कठिण प्रसंगीं त्यांचा उपयोग व्हावयाचा नाहीं आणि ते बँकेच्या मालकीचे असूननसून सारखेच. कारण, त्यांच्या तारणावर रोकड उभी करतां येणार नाहीं किंवा ते विकतां यावयाचे नाहींत.

ब्रिटिश बँकांमध्यें रोख्यांचें हें प्रमाण ३० टक्के आहे म्हणून तें ह्या देशांतल्या भिन्न परिस्थितींत युक्त आहे कीं काय हा येथें प्रश्न आहे. कांहीं बँका ठेवींचा बहुतेक पैसा कर्जे देण्यांत वापरतात आणि त्यांचें स्वतःचें भांडवलहि फार नसतें. ह्यामुळें त्यांनीं स्वीकारलेल्या ठेवींच्या सुरक्षितपणास बाध येतो. ह्या कारणानें त्यांनीं ठेवींच्या ३० टक्के एवढी रकम रोखींत व सरकारी कर्जरोख्यांत गुंतवलीच पाहिजे असा निर्बंध घालण्याविषयींची सूचना करण्यांत आली आहे. कर्जरोख्यांची मर्यादा नेहमीं संभाळलीच पाहिजे असें असल्यानें नडीच्या व निकडीच्या प्रसंगीं त्यांचा तारण म्हणून किंवा विकण्यास त्यांचा कांहींच उपयोग व्हावयाचा नाहीं. मग ह्या कर्जरोख्यांचा असा आग्रह कां ? कायदा अंमलांत आल्यानंतर दोन वर्षांची मुदत कर्जरोख्यांच्या अटीबाबत देण्यांत आली आहे. तरी लहान आकाराच्या बँकांस कर्जरोख्यांची तरतूद झेपण्यासारखी नाहीं अशी तिच्या विरुद्ध तक्रार आहे. अडचणीचे प्रसंगीं रिझर्व्ह बँकेनें ह्या रोख्यांच्या तारणावर बँकांस अल्प मुदतींचीं कर्जे द्यावीं अशी सदरहू सूचना लक्षांत घेऊन मराठा चेंबरनें केली आहे, ती स्वीकारणीय आहे. बँकांवर कायद्याचीं नियंत्रणें घालण्यांत आल्यावर रिझर्व्ह बँकेनें त्यांस शेड्यूल्ड बँकांच्या बरोबरीनें वागवून त्यांचे प्रमाणेंच सवलती द्याव्या हें उचित आहे अशीहि सूचना चेंबरनें केली आहे. भांडवलाच्या बाबतींत चालू बँकांस कायद्यानें घातलेल्या मर्यादेपर्यंत पोहोंचण्यास पुरेशी मुदत द्यावी ही चेंबरची मागणी न्याय्य आहे. एकंदरीनें पहातां महाराष्ट्रीय बँका व मराठा चेंबर ह्यांनीं बँकिंग विषयींच्या कायद्याचा विचार समतोल बुद्धीनें केला असून त्यांत सयुक्तिक अशाच सुधारणा व दुरुस्त्या सुचवल्या आहेत, असें दिसून येईल.

## हिंदी कपाशीच्या बाजारभावाचें नियंत्रण शक्य आहे काय ?

### श्री. रमणलाल जी. सरय्या ह्यांचे उद्बोधक विचार

( १ )

हिंदुस्थानांत कपाशीचें पीक मोठें निघतें व कपास पिकवणाऱ्या जगांतील देशांच्या यादींत ह्या देशाचा नंबर चांगलाच वर लागतो. तसेंच, मोठ्या शेतकरी वर्गाची उपजीविका ह्या पिकावर अवलंबून आहे. तथापि, अलीकडे कपाशीचें भाव विलक्षण घसरल्या कारणानें शेतकऱ्यांची मिळकत घटली आहे आणि हें पीक मर्यादित क्षेत्रांत करून त्याची किंमत चढण्यास मदत यावी किंवा दुसऱ्या कोणत्या तरी उपायांनीं कपाशीचे भाव वर जातील असें करावें ह्या प्रकारच्या विचारांस चालना मिळाली आहे. अमेरिकेंत तेथील सरकारनें आपल्या शेतकऱ्यांस भावांच्या मंदीचे काळांत सहाय देऊन किंमती घसरणार नाहींत अशीहि खटपट केली आहे. असाच एखादा उपाय हिंदुस्थानांत शक्य नाहीं काय हा प्रश्न येथें उपस्थित झाल्यावांचून रहात नाहीं. ह्या दृष्टीनें प्रस्तुत विषयावर एखाद्या तज्ज्ञाचा अभिप्राय उपलब्ध झाल्यास सामान्य माणसास तो विचारप्रवर्तक व मार्गदर्शक होईल ह्यांत संशय नाहीं. श्री. रमणलाल सरय्या हे विद्वान असून कपाशीच्या व्यापारांत तरबेज आहेत. मुंबईच्या सिडेनहॅम कॉलेजच्या कापूस समितीच्या एका सभेंत त्यांनीं अलीकडे एक माहितीनें भरलेलें व मुद्देसूद भाषण करून हिंदी कपाशीच्या बाजारभावांचें नियंत्रण करणें कितपत व्यवहार्य आहे ह्या विषयाचें विवेचन केलें. त्या भाषणांतली महत्त्वाची माहिती आणि मुद्दे ह्यांचा गोषवारा आम्हीं येथें देण्याचें योजिलें आहे.

कपास ही जागतिक महत्त्वाची वस्तु आहे. अमेरिका, हिंदुस्थान, इजिप्त, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, चीन व रशिया ह्या देशांत तिचें पीक होतें आणि जगांतील प्रत्येक देशांत कापूस लहान-मोठ्या प्रमाणांत वापरण्यांत येतो. जगांतील पुरवठा व मागणी ह्यांचा मेळ बसून जास्तींत जास्त विक्रेते आणि खरेदीदार ह्यांचें समाधान ज्या किंमतीनें व्यवहारांत घडून होतें, ती असल्या मालाची किंमत होय, उत्पादकास पडलेला खर्च व झीज सोसण्याची त्याची तयारी आणि विकत घेणाराच्या मागणीची तीव्रता व सांपत्तिक बळ ह्यांचा मेळ बसून ही किंमत निश्चित होते. जगड्व्याळ अशा कपाशीच्या पिकाच्या किंमतीचा विचार कर्तव्य असतां पृथ्वीवरील अनेक देशांतील मागणीपुरवठ्याविषयींची परिस्थिति लक्षांत घेऊन तिच्या संबंधानें निर्णय करावा लागतो. अलीकडे कपाशीचें जागतिक उत्पादन पावणे तीन ते तीन कोटि गांठी इतकें आहे. ह्यापैकीं हिंदुस्थानचा वांटा अर्धा ते पाऊण कोटि गांठी एवढा आहे. जगांतला एकूण खप पावणे तीन कोटि गांठी आहे आणि हिंदुस्थानचा कपाशीचा उठाव फक्त एक तृतियांश कोटि गांठी एवढाच आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. हिंदुस्थानांत पिकणाऱ्या कपाशीपैकीं सुमारें निम्मा भाग येथल्या येथें खपूं शकत नाहीं आणि तो परदेशांत पाठवल्यावांचून गत्यंतर नसतें. अशा रीतीनें कपाशीच्या बाबतींत उत्पादनांत किंवा खपांत हिंदुस्थानास मक्तेदारीचें अथवा निर्णायक स्थान नसल्यानें त्या पिकाचे बाजारभाव निश्चित करण्याचें सामर्थ्य ह्या देशास कसें असणार ? हिंदुस्थानांतही वापरून राहिलेली शिल्लक कपास जागतिक किंमतीनेंच विकली जाणें अपरिहार्य आहे आणि अंतर्गत किंमत ह्या भावासच धरून राहिली पाहिजे, हें उघड आहे. ह्या स्थितीवर दोनच उपाय सुचण्यासारखे आहेत. एक, हिंदी कपाशीचें उत्पादन मर्यादित करणें किंवा दुसरा पिकणारी सर्व कपास देशांतल्या देशांत सबंध खपवणें. हे उपाय कितीसे व्यावहारिक आहेत, ह्याचा विचार होणें आवश्यक आहे. उत्पादन कमी करणें म्हणजे ४० टक्के कपास काढून टाकणें होय. एवढ्या पिकाच्या बदली दुसरें कोणतें फायदेशीर पीक करण्यास तुम्हीं शेतकऱ्यांस सांगणार ? तेव्हां ह्या मार्ग अव्यवहार्य म्हणून सोडून द्यावा लागतो. हिंदुस्थानांत पिकणारी सर्व कपास येथल्या येथेंच खपवून टाकावी असें म्हणणेंहि तितकेंच अव्यवहार्य आहे. परदेशांतून येणाऱ्या सर्व कापसास व कापडास बंदी केली तरी त्याचा परिणाम कांहीं होण्या जोगा नाहीं. १९३८-३९ साल घेतलें तर त्यांत हिंदुस्थानांत देशी कापसाच्या ३१ लक्ष गांठी खपल्या; परदेशी कापसाच्या ४½ लक्ष गांठी आयात झाल्या आणि ६७½ कोटि चौरस वार परदेशी कापड देशांत आलें असें दिसतें. परदेशांतून येणारा कापूस उंची जातीचा असतो आणि तलम कापड येथील गिरण्यांत तयार होण्यास त्याची आवश्यकता आहे. हिंदी गिरण्यांत सुमारें ४२७ कोटि वार कापड निघतें आणि हातमागांवर १५० कोटि वार तयार होतें. ह्या मानानें बाहेरून येणारें कापड (६७½ कोटि वार) फार अल्प आहे आणि त्यास लागणारा कापूस ४½ लक्ष गांठी इतका असतो असें धरण्यास हरकत नाहीं. ह्यावरून असें दिसून येईल कीं परदेशी कापूस व कापड ह्यांची आयात बंद होऊन देशी कापसाचा उपयोग त्यांचे जागीं केला तरी देशी कापसाच्या स्थानिक खपांत म्हणण्यासारखी भर पडत नाहीं आणि त्याचें पराराष्ट्रीय बाजारांवरचें अवलंबन फारसें कमी होत नाहीं. हिंदी जनतेची रहाणी मोठ्या प्रमाणांत सुधारली, देशी कापडाचा खप दुप्पट झाला आणि देशी कापूस दुसऱ्या धंद्यांत कच्चा माल म्हणून खपूं लागला तर हिंदुस्थानाचें हें परावलंबन दूर होऊं शकेल. परंतु ह्या गोष्टी आज किंवा उद्यां घडून येण्यासारख्या नाहींत आणि हिंदी कपाशीचें पीक सर्वच्या सर्व देशांतल्या देशांत उपयोगांत येण्याची शक्यता भविष्य काळावर ढकलली पाहिजे. हिंदी कपाशीची किंमत निश्चित व नियंत्रित करण्यास हा मार्ग आज तरी मोकळा नाहीं आणि ही किंमत जागतिक परिस्थिति आणि विशेषतः अमेरिकन कापसाचा पुरवठा ह्यांनींच मर्यादित होणें अपरिहार्य आहे. हिंदी कापसाच्या किंमतीस कमाल व किमान मर्यादा घालणें सद्यःस्थितींत शक्यतेच्या मर्यादेच्या बाहेरचें आहे.

---

### टॅन्जीअर्स

उत्तर आफ्रिकेंतील टॅन्जीअर्स प्रदेश स्पॅनिश सैनिकांनीं आपल्या ताब्यांत घेतला आहे. या प्रदेशाचें क्षेत्रफळ २२५ चौरस मैल असून त्याची वस्ती ६०,००० आहे. ग्रेट ब्रिटन, फ्रान्स आणि स्पेन ह्यांचेमधील १९२३ सालाच्या कराराप्रमाणें ह्या प्रदेशाची व्यवस्था पाहिली जाते. ह्या करारास १९२८ सालीं इटलीनें मान्यता दिली आणि प्रस्तुत कराराची मुदत १९३५ सालीं १२ वर्षांनीं वाढविण्यांत आली. २७ सभासदांच्या आंतरराष्ट्रीय असेंब्लीकडे टॅन्जीअर्सची व्यवस्था आहे. टॅन्जीअर्सचें आंतरराष्ट्रीय स्वरूप कायम राहून त्याचा तटस्थपणा टिकावा, ह्यासाठीं स्पेननें टॅन्जीअर्समध्यें आपले सैनिक पाठविले आहेत.

## स्फुट विचार

### इटलीचा संधीसाधूपणा

जर्मन सैन्याची प्रगति फ्रान्समध्यें पॅरिसच्या बाजूस होत आहे असें पाहून इटलीनें जर्मनीच्या बाजूनें युद्धांत उडी टाकली आहे. वाघानें एखादें जनावर मारण्याची वाट ज्याप्रमाणें गिधाडें पहात असतात, त्याप्रमाणें आपला शेजारी फ्रान्स संकटांत पडलेला दिसतांच इटली त्यावर चालून गेला आहे. ह्या मुसोलिनीच्या कृत्यांत शौर्याचा भाग थोडा आहे. इटालिअन लष्करी सामर्थ्याच्या बढाया मारून आपल्या लोकांस त्यानें आजपर्यंत झुलवलें आहे, परंतु त्यास उघडपणें दोस्त राष्ट्रांविरुद्ध युद्ध पुकारण्याचें धैर्य झालें नाहीं. इकडे हिटलरशीं आपलें सख्य आहे असें दाखवून दुसरीकडे तटस्थपणाची वृत्ति अंगिकारावयाची आणि इंग्लंडविरुद्ध धमकीची भाषा बोलत राहून अनिश्चिततेचें व अस्वस्थतेचें वातावरण युरोपांत निर्माण करावयाचें हा खेळ मुसोलिनी बराच काळपर्यंत खेळत राहिला होता. इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन्ही राष्ट्रांनीं परस्परामधील मतभेदाचीं कारणें वाटाघाटीनें काढून टाकण्याचीं बोलणीं केलीं असतां टोलवाटोलव करावयाची आणि युद्धाची भाषा सारखी बोलत राहून आपण शांततावादी आहों असें भासवावयाचें हा प्रकार त्यानें चालवला होता. भूमध्य समुद्र इटलीच्या वर्चस्वाखाली असला पाहिजे आणि इंग्लंड व फ्रान्स ह्यांनीं इटलीचा कोंडमारा केला आहे हें रडगाणें गाऊन संधि सापडतांच त्या राष्ट्रांवर हल्ला चढवण्यांत मुसोलिनीनें अखेर आपलें सत्य स्वरूप उघड केलें आहे. दोस्त राष्ट्रें ह्या बाबतींत साशंक होतांच त्यांनीं इजिप्तच्या बाजूस रक्षणाची चांगली तयारी केली असून इटलीस प्रस्तुत युद्ध सोपें जावयाचें नाहीं. मुसोलिनी व इटली ह्यांची हिटलर व जर्मनी ह्यांच्याशीं जोडी जमली आहे आणि शेवटीं त्यांचा नाश ठरलेला आहे. अमेरिकन राष्ट्रास इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्या बाजूस खेंचण्यास मुसोलिनीनें सहायच केलें आहे.

---

### बँकिंगचा कायदा व मराठा चेंबर

मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाबरोबर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्रांतील जॉइंट स्टॉक बँकांच्या प्रतिनिधींस निमंत्रण करण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें गेल्या बुधवारीं पुण्यांतील बँकांचे प्रतिनिधि जमले होते. प्रथम प्रो. काळे ह्यांनीं बँकिंगच्या कायद्याविषयींचा प्रश्न कसा उपस्थित झाला, बँकांच्या व्यवहारांत कोणते दोष आढळून आले आहेत, ते नाहींसे करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें कोणती उपाययोजना सुचवली आहे आणि नियोजित कायद्याच्या मसुद्यांत चर्चेच्या महत्त्वाच्या बाबी कोणत्या आहेत ह्याचें थोडक्यांत विवेचन करून जमलेल्या मंडळीस आपापलें म्हणणें पुढें मांडण्याची सूचना केली. थोडी सर्वसामान्य चर्चा झाल्यावर त्यांनीं भागभांडवलाची मर्यादा, रोख्यांत गुंतवण्याच्या रकमेचें प्रमाण, शाखांचा विस्तार, रिझर्व्ह बँकेपासून अपेक्षित सहाय ह्या एकेक प्रश्नाच्या चर्चेचा उपन्यास केला. ह्या प्रत्येक बाबीचे संबंधांत रिझर्व्ह बँकेचें काय म्हणणें आहे याचा तपशीलवार विचार करण्यांत आला. सर्वसंमत असा निष्कर्ष चर्चेमधून निघाला तो असा. बँकांस भांडवलाची मर्यादा सरसहा एक लक्ष रुपयांची पुरे व्हावी आणि प्रांतांतील प्रत्येक शाखेगणिक पंचवीस हजार रुपयांची मर्यादा घालावी. मागणी केलेलें भांडवल काढलेल्या भांडवलाच्या निम्में असावें आणि भरलेलें भांडवल ह्याचा निम्म्या एवढें असावें. बँकांनीं कर्जरोख्यांत गुंतवावयाच्या रकमेची मर्यादा ठेवींच्या २५ टक्क्यांइतकी असावी, कोणत्याहि बँकेस विशेष कारणांमुळें जरूर लागेल तेव्हां ह्या मर्यादेंतील रोख्यांवर तात्पुरतें कर्ज देऊन तिची गरज भागवावी आणि सर्व बँकांवर कायद्याचें नियंत्रण आणि रिझर्व्ह बँकेची नजर रहाणार असल्याकारणानें शेड्यूल्ड बँकांस आज सवलती मिळत आहेत, त्या सर्वांस सारख्याच मिळाव्या. मराठा चेंबरनें वरील चर्चेच्या अनुरोधानें हिंदुस्थान सरकाराकडे आपल्या सूचना पाठवल्या आहेत. बँकिंगच्या कायद्यांतल्या मुलभूत तत्त्वास मान्यता देऊन मध्यम दर्जाच्या महाराष्ट्रीय बँकांच्या व्यवहारांत अडचणी येऊन त्यांची प्रगति खुंटूं नये अशा उद्देशानें सयुक्तिक अशा ह्या दुरुस्त्या आहेत असें दिसून येईल.

---

### कागदाच्या तुटवड्याचा वर्तमानपत्रांवर परिणाम

नॉर्वे, फिनलंड, स्वीडन आणि एस्टोनिया ह्या देशांतून कागदाची होणारी आयात युद्धपरिस्थितीमुळें आतां बंद झाली आहे आणि त्या कारणानें कागदाचा पुरवठा अपुरा पडूं लागला आहे. वर्तमानपत्रांना आपलीं पानें कमी करावीं लागलीं असून कित्येकांस आपली किंमत वाढविणें प्राप्त झालें आहे. डेली मिरर न्यूज पेपर्स लि., ह्या ब्रिटिश कंपनीची वार्षिक सभा नुकतीच भरली होती, त्यावेळीं तिच्या अध्यक्षांनीं ह्या प्रश्नाचा उल्लेख केला. ते म्हणाले:— "कॅनडा आणि न्यू फौंडलंड येथून कागद आणविण्याचा प्रयत्न चालू आहे. वर्तमानपत्राचीं पृष्ठें कमी करून अडचणींतून मार्ग काढण्याची खटपट सुरू आहे. परंतु, पृष्ठें कमी केल्यामुळें जाहिराती पुरेशा देतां येत नाहींत आणि त्याचा परिणाम उत्पन्नावर होतो. 'डेली मिरर'चा रोजचा खप १७½ लक्ष प्रतींचा आहे. प्रती वाढल्या म्हणजे कागद अर्थातच अधिक लागतो. ह्यामुळें आम्हांस जाहिरातीचे दर वाढवावे लागले आहेत. तथापि, अंकाची किंमत ही कायम ठेवण्यांत आली आहे. प्रसंग पडल्यास लंडन शहराचे बाहेर अनेक केंद्रांत 'डेली मिरर' छापण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे." युद्ध चालू होण्यापूर्वी कागदाची जेवढी खरेदी होत असेल, तिच्या केवळ ३०% इतकीच खरेदी तेथील सरकारनें होऊं देण्यासंबंधीं नियम केले आहेत. सहाजीकच, वर्तमानपत्रांना प्रतींच्या संख्येचे बाबतींत शक्य ती काटकसर करणें भाग पडलें आहे. न खपलेल्या प्रती एजंटांकडून अजिबात परत न घेण्याचें धोरण त्यांनीं अंगीकारलें आहे. हिंदुस्थानांतील कित्येक वर्तमानपत्रांनीं पृष्ठसंख्या कमी केली आहे आणि कांहीं पत्रांनीं आपली किंमत वाढविली आहे. हिंदी वर्तमानपत्रांच्या धंद्याची परिस्थिति विशेष समाधानकारक नसल्याकारणानें लहान पत्रांस कागदाची अडचण फारच तीव्रतेनें भासणें सहाजीक आहे.

---

### हॉलंडच्या आशियांतील वसाहती

जर्मन फौजांनीं हॉलंड देश पादाक्रांत केला आणि त्याचें स्वातंत्र्य नष्ट केलें तरी डच सरकार अजून अस्तित्वांत आहे. एशिया खंडांतील डच वसाहती (ईस्ट इंडीज) तर अबाधित आहेत. त्यांचें आर्थिक महत्त्व किती आहे ह्याची कल्पना येथें अगत्याचें आहे. ह्या वसाहती हॉलंडच्या ताब्यांत गेलीं साडेतीनशे वर्षें राहिल्या असून डच राष्ट्राच्या त्या संपत्तीचें भांडारच आहेत असें

म्हणण्यास हरकत नाहीं. जगाच्या रबराच्या पैदाशीपैकीं एक तृतियांश त्यांमधून येतो. त्याशिवाय, तेल, जस्त, सोनें, सासर, कॉफी व अनेक धातू ह्यांचें तेंथील उत्पन्न फार मोठें आहे. हॉलंड देश आपल्या एशियाटिक वसाहतींवर जगतो ही एक म्हणच होऊन गेली आहे आणि तेथें कोट्यवधि लोकांवर त्याचें राज्य चालत आलें आहे. डच ईस्ट इंडीजमध्यें जाव्हा, सुमात्रा, बोर्निआ बली इत्यादि बेटांचा अंतर्भाव होतो हें लक्षांत घेतलें म्हणजे त्या वसाहतींचें आर्थिक महत्त्व हॉलंडला कां आहे हें तेव्हांच समजेल. त्यांच्या भौगोलिक स्थानामुळें राजकीय दृष्टीनेंहि ह्या वसाहती विशेष महत्त्वाच्या होऊन बसल्या आहेत. एका बाजूस हिंदुस्थान, दुसऱ्या बाजूस ब्रिटिश वसाहती, तिसरीकडे ऑस्ट्रेलिया व फिलिपाइन्स व चौथ्या बाजूस जपानच्या वर्चस्वाखालील मुलूख अशी चौफेर स्थिति आहे आणि हीं बेटें हिंदी महासागर व पॅसिफिक ह्यांमधील मार्गावर आडवीं आलेलीं आहेत. हॉलंड सारख्या चिमुकल्या राष्ट्राच्या हातीं ह्या एशियाटिक वसाहती इतकीं वर्षें टिकल्या आहेत ह्याचें रहस्य एका जपानी लेखकाच्या मतें हॉलंडच्या तटस्थपणाच्या युरोपांतील धोरणांत सांपडण्या सारखें आहे.. तटस्थपणा हॉलंडला युरोपांत उपयोगी पडलेला नाहीं. हें जर्मनीच्या अन्याय्य व अमानुष वर्तनावरून दिसून आलें आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, जपान इत्यादि राष्ट्रांचे हितसंबंध डच ईस्ट इंडीजच्या तटस्थपणांत गुंतले आहेत, हें येथें विसरतां कामा नये. आपलें आर्थिक वजन त्या डच वसाहतींमध्यें वाढावें अशी महत्त्वाकांक्षी जपानची इच्छा असणें स्वाभाविक आहे. पण इंग्लंड त्यांचा तटस्थपणा व स्वातंत्र्य हीं टिकावीं ह्याविषयीं खबरदारी घेईल. ह्या बेटांत ब्रिटिश भांडवल मोठ्या प्रमाणांत गुंतलेलें आहे; त्यांच्याशीं इंग्लंडचा व्यापारही मोठा आहे. सध्यांच्या युद्धांत हॉलंड दोस्त राष्ट्रांच्या बाजूस आहे आणि डच लोकांस इंग्लंडच्या सहाय्यानें आपलें स्वातंत्र्य फिरून मिळवावयाचें आहे.

### सहकारी बँकांच्या हिशेब तपासणीचा प्रश्न

ता. ५ जून, १९४० च्या अंकांत "सहकारी बँकांच्या हिशेबतपासणीचा प्रश्न" ह्या लेखांत, दोन हजार रुपये भाग भांडवलाच्या अ व ब वर्गांतील अर्बन बँक्स व मुंबई शहरांतील सहकारी सोसायट्या ह्यांचे ऑडिटसाठी धंदेवाल्या हिशेबतपासनिसाची नेमणूक होण्यास मुभा असावी, ही भणसाळी-मेथा रिपोर्टांतील सूचना सरकारनें स्वतःस मान्य असल्याचें प्रसिद्ध केलें आहे, अशा अर्थाचा मजकूर आला आहे.

"मुंबई शहरांतील सहकारी सोसायट्या "ऐवजी "मुंबई विभागांतील २० हजारांपेक्षा अधिक भाग भांडवलाच्या सॅलरी अर्नर्स सोसायट्या "चे बाबतीत धंदेवाइक ऑडिटरांच्या नेमणुकीसंबंधीं सरकारी हुकूम आहे. त्याप्रमाणें मजकुरांत दुरुस्ती करून तो वाचावा.


**For Collegians**
**Wooden & Iron Furniture**
FOR SALE AND HIRE
Your Popular Old Shop
**SHEVAK BROS.**

| *Work-Shop Address:* | *Branch No. 1* |
|---|---|
| 153 Kasaba, | Shevak Quarters, near Ferguuson College |
| Poona 2 | Poona 4 |

## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.
### जळगांव.

(स्थापना : मे १९१६) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००/- |
| जमा झालेलें शेअर भांडवल....... | ४,६९,०००/- |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००/- |
| इतर फंडस्. ...... | ३,७७,०००/- |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००/- |

डिव्हिडंड पांच टक्के (सहा वर्षांपासून)

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग, नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे, चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवींवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

बी. डी. देशमुख,
चेअरमन.

## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.
☞ किं. १ रु. ८ आणे ☜
१ रु. १० आ. ६ पै चीं तिकिटें पाठवून मागणी करा.
: लेखक :
प्रो. वा. गो. काळे ◆ श्री. श्री. वा. काळे
बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक
"अर्थ" ग्रन्थमाला, : : पुणें ४.

# बँकिंग नियंत्रण कायद्याचा मसुदा

## मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सूचना

### विचारविनिमयाची सभा

ठेवीदारांच्या हितसंबंधांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें हिंदुस्थानांतील जॉईंट स्टॉक बँकांच्या धंद्याचें नियंत्रण करण्याकरितां रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें हिंदुस्थान सरकारला सादर केलेल्या बँकिंग नियंत्रण कायद्याच्या मसुद्याचा विचार करण्याकरतां महाराष्ट्रांतील व्यापारी बँकांचे प्रतिनिधी व मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळाचे समासद यांची संयुक्त सभा मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या विद्यमानें केसरी-मराठा संस्थेच्या सभागृहांत बुधवार ता. १२ जून या दिवशीं सायंकाळीं ४॥ वाजतां मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष प्रो. वामन गोविंद काळे यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सभेला अध्यक्षांसेरीज श्री. आ. रा. भट, रा. न. अभ्यंकर, द्वा. वा. पोतदार, ग. रा. साठे, द्वा. ग. बापट, बँक ऑफ महाराष्ट्राचे मॅनेजर म. वि. गोखले, प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. चिं. त्रिं. चितळे, भारत इंडस्ट्रिअल बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर नी. ना. क्षीरसागर, वि. वि. वर्तक, न. गं. आपटे, ह. श्री. घारे, न. प. केळकर, प्रभृति गृहस्थ उपस्थित होते. सुमारें दीड तास चर्चा होऊन रिझर्व्ह बँकेनें केलेल्या मसुद्याचा महाराष्ट्रांत अजून बाल्यावस्थेंतच असलेल्या बँकिंगच्या धंद्याच्या दृष्टीनें सांगोपांग विचार करण्यांत आला. त्याला अनुसरून मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळानें हिंदुस्थान सरकारच्या फडणविशी खात्याचे चिटणीस व फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सनें सदर मसुद्याचा विचार करण्याकरितां नेमलेली उप-समिति यांना बँकिंगच्या धंद्याच्या नियंत्रणाबाबत पुढें दिल्याप्रमाणें मत कळविलें आहे.

### नियंत्रणाचें तत्व मान्य

"रिझर्व्ह बँकेनें बँकिंगच्या धंद्याच्या नियंत्रणाबाबत ज्या सूचना केल्या आहेत त्यांतील तत्व सर्वसाधारणपणें मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला मान्य आहे. या धंद्याची वाढ योग्य दिशेनें सुरक्षित पायावर होण्यास त्याचें कायद्यानें नियंत्रण होणें आवश्यक असलें तरी सदर नियंत्रणामुळें नवीन बँका अस्तित्वांत येणें अशक्य होता कामा नये; अगर विद्यमान छोट्या बँकांची वाढ त्यामुळें खुंटता कामा नये. ही गोष्ट लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँकेनें तयार केलेल्या कायद्याच्या मसुद्यांत पुढीलप्रमाणें फेर केला जाणें आवश्यक आहे.

### जमा झालेलें किमान भांडवल

"कोणत्याहि बँकेचें जमा झालेलें शेअर भांडवल किमान रु. १ लक्ष असल्याशिवाय तिला व्यवहार सुरू करण्यास परवाना देऊं नये, ही रिझर्व्ह बँकेची सूचना मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला संमत आहे.

"जर मुंबई व कलकत्ता या शहरांबाहेर स्थापन झालेल्या बँकेला यापैकीं कोणत्याहि एका शहरांत शाखा काढावयाची असेल तर तिचें जमा झालेलें भांडवल आणखी रु. १ लक्ष, या दोनही शहरांत काढावयाची असल्यास आणखी प्रत्येकीं रु. १ लक्ष व इतर कोणत्याहि शहरीं शाखा काढणें असेल तर अशा प्रत्येक शहरामागें जादा रु. २५ हजारांचें तरी असलें पाहिजे. रिझर्व्ह बँकेशीं सलग्न असलेल्या अर्थात् शेड्यूल्ड बँकेला ती ज्या प्रांतांत स्थापन झाली असेल त्या प्रांतांत शाखा उघडण्यास जादा शेअर भांडवल जमा असण्याची आवश्यकता नाहीं. ( बँकेचें जमा झालेलें भांडवल व शिलकी फंड यांची रक्कम रु. ५ लक्ष असेल तीच शेड्यूल्ड बँक होते. )

"अर्थातच कलकत्ता व मुंबई या शहरांत व्यवहार करणाऱ्या प्रत्येक बँकेचें जमा झालेलें भांडवल या प्रत्येक शहराकरितां किमान रु. ५ लक्ष असावें व १ लक्षाहून अधिक वस्तीच्या गांवीं व्यवहार करावयाचा झाल्यास प्रत्येक गांवागणिक रु. २ लक्षांचे जादा जमा-भांडवल पाहिजे." या रिझर्व्ह बँकेच्या सूचना मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला मान्य नाहींत.

### अटी पुऱ्या करण्यास पांच वर्षांची मुदत

"तसेंच बँकांच्या नियंत्रणाचा कायदा अंमलांत येण्याच्या दिवशीं ज्या बँका अस्तित्वांत असतील त्यांना सदर कायद्यांतील भांडवलासंबंधी अटी पुऱ्या करण्यास पांच वर्षांची मुदत देण्यांत यावी. मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला रिझर्व्ह बँकेनें सुचविलेली दोन वर्षांची मुदत अपुरी वाटते.

"कोणत्याहि बँकेच्या अधिकृत भांडवलाच्या किमान ५० टक्के भांडवल विक्रीस काढलेलें असलें पाहिजे व त्याच्या किमान ५० टक्के वसूल झालेलें असलें पाहिजे. ही रिझर्व्ह बँकेची सूचना मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला मान्य आहे. या बाबतींत कार्यकारी मंडळाला जी सूचना करावयाची आहे ती अशी कीं ज्या बँकिंग कंपन्यांचें अधिकृत भांडवल वरील अटी पाळण्याच्या दृष्टीनें त्यांच्या संचालक मंडळांना मर्यादेबाहेर वाटत असेल त्यांना ते शेअर होल्डरांच्या संमतीनें कमी करून घेण्याची परवानगी असावी व तें तसें कमी केल्यावर बँकेच्या नांवापुढें 'भांडवल कमी केलेली' अगर तत्सम पद लावलें जाऊं नये.

### तरतें भांडवल

"बँकेच्या मालमत्तेपैकीं केवढा हिस्सा तरता अर्थात् ज्याचा पैसा त्वरित उभा होऊं शकेल असा ठेवावा याबाबत रिझर्व्ह बँकेनें ३० टक्के मालमत्ता रोकड व रोखे यांत असावी व हे रोखे कोठेंहि तारण दिलेले नसावे अशी सूचना केली आहे, ती मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला मान्य आहे. परंतु यासंबंधी चेंबरच्या कार्यकारी मंडळाचें असें स्पष्ट व आग्रहाचें म्हणणें आहे कीं अडचणीच्या परिस्थितींत, तशी रिझर्व्ह बँकेची खात्री झाल्यावर, या रोख्यांच्या तारणावर रिझर्व्ह बँकेनें कर्ज देण्याची व्यवस्था असावी. त्याकरतां रिझर्व्ह बँकेनें सुचविल्याप्रमाणें सरकारकडे संमतीकरतां धाव घेण्याची आवश्यकता असूं नये.

"रिझर्व्ह बँकेनें केलेल्या इतर सूचना मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाला संमत आहेत.

"शेवटीं कार्यकारी मंडळाची अशी विनंति आहे कीं, बँकिंग नियंत्रणाचा कायदा अमलांत आल्यावर सांप्रत संलग्न बँकांना रिझर्व्ह बँक ज्या सवलती देते त्या सवलती सर्वच बँकांना मिळाव्या."

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स लक्ष्मीरोड, पुणें.

आत्माराम रावजी भट, गोपाळ दत्तात्रय आपटे, संयुक्त कार्यवाह.

## शिरगणतीचे वेळीं कोणते प्रश्न विचारणार ?

१९४१ सालांतील हिंदी शिरगणतीचे वेळीं प्रत्येकास खालील २२ प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागतील:—

१ नांव
२ स्त्री अगर पुरुष
३ जात
४ धर्म
५ विवाहित, अविवाहित, विधुर, विधवा कीं काडीमोड झालेला
६ वय
७ (विवाहित स्त्रीच्या) अपत्यांची संख्या
८ पहिल्या अपत्याचे वेळीं आईचें वय
९ दुसऱ्यावर पूर्णत्वानें अगर अंशतः अवलंबून ?
१० ज्यावर अवलंबून, त्याच्या उदरनिर्वाहाचें साधन
११ पगारी नोकर अगर घरांतील लोक ह्यांस काम देतां काय ?
१२ सध्या नोकरी आहे काय ?
१३ ( १२ व्या प्रश्नास नकारार्थी उत्तर देणारास ) नोकरीची खटपट चालू आहे काय ? ( ह्या प्रश्नास होकार देणारास पुनः ) किती काळ खटपट चालू आहे ?
१४ उपजीविकेचीं साधनें, त्यांच्या महत्त्वाच्या दृष्टीनें क्रम लावून
१५ ( नवव्या प्रश्नाप्रमाणें दुसऱ्यावर अंशतः अवलंबून रहाणारास चवदाव्या प्रश्नांतील दुसऱ्याच्या दुय्यम साधनांवर अवलंबून रहाणारास ) हें साधन वर्षभर कायम असतें काय ? नसल्यास, किती महिने ?
१६ दुसऱ्याची नोकरी करीत असल्यास, मालकाचा धंदा
१७ ह्या जिल्ह्यांत जन्मला काय ? नसल्यास कोणत्या जिल्ह्यांत ?
१८ मातृभाषा
१९ येत असलेल्या इतर हिंदी भाषा
२० लिहितां आणि वाचतां, दोन्हीं येतें काय ? कोणती लिपी लिहितां ?
२१ फक्त वाचतां येतें काय ?
२२ वाचन किती झालें आहे ? उत्तीर्ण झालेल्या परीक्षांची यादी. इंग्रजी भाषेशी परिचय आहे काय ?

---

### राष्ट्रसंघाचें युद्धकालीन कार्य

हल्लीच्या युद्धामुळें राष्ट्रसंघाच्या कामांत कांहींहि खंड पडूं न देण्याचा प्रयत्न चालू आहे. दरवर्षी निघणारें आर्मामेंट्स इअरबुक धंदाहि तयार होत असून त्यांत निरनिराळ्या राष्ट्रांची शस्त्रास्त्रविषयक माहिती अधिकृतरीत्या देण्यांत येणार आहे. आर्थिक विभाग, युद्धाचे व्यापार व अर्थशास्त्रावर होणारे परिणामांचा अभ्यास करीत असून त्यासंबंधींची माहिती मासिकांतून व पुस्तकांतून देण्यांत येत आहे. आरोग्यविभाग,कोठेंही साथी फैलावूं नयेत म्हणून दक्षता बाळगीत आहे. आहार, खेडेगांवांतील आरोग्य, घरबांधणी यासारखे लोकोपयोगी विषयांचें संशोधन चालू आहे. सामाजिक विभाग युद्धामुळें उपस्थित होणाऱ्या नवीन सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करीत आहे. इतर सर्व विभागांचें कामही नोकरांची घटला असला तरी चालू आहे.

## संरक्षित धंदा आणि किमान दराची आकारणी

### कारखानदारांच्या त्रुटीचा इष्टानिष्ट परिणाम

सिमला येथें गेल्या आठवड्यांत साखर परिषद् भरली होती, त्या वेळीं व्यापार मंत्री, सर रामस्वामी मुदलियार हे तिचें उद्घाटन करतांना म्हणाले:—

" हिंदी साखरेच्या धंद्यापुढें दोन महत्त्वाचे प्रश्न आहेत. साखरेच्या फाजील साठ्याचा उठाव कसा करावयाचा आणि ह्या संरक्षित धंद्यांतील हितसंबंधी लोकांच्या अनिष्ट कारवायांचा वाईट परिणाम कसा न होऊं द्यावयाचा, हे ते प्रश्न होत. भांडवलशाहीच्या तत्त्वाप्रमाणें, व्यापाऱ्यांनीं परस्पर हिताचे दृष्टीनें संघटना केली, तर तो गुन्हा होत नाहीं, परंतु संरक्षित धंद्याचे बाबतींत इतर गोष्टींचाहि विचार करणें आवश्यक ठरतें. संरक्षण देणारें सरकार ह्या दृष्टीनें, तें संरक्षण पुरेसें आहे किंवा नाहीं आणि संरक्षणामुळें इतरांच्या हितसंबंधांस धोका पोंचतो किंवा काय, ह्या गोष्टींचा मध्यवर्ती सरकारास विचार करावा लागतो. साखरेच्या धंद्याचा कच्चा माल फार काळ टिकूं शकत नाहीं; सिमेंट अगर कापड ह्या धंद्यांचें तसें नाहीं. ही गोष्ट टारिफ बोर्डानें लक्षांत घेऊनच, साखरेच्या धंद्यास संरक्षण दिलें तेव्हां त्याबरोबर उंसाची लागवड करणारासहि संरक्षण मिळालें पाहिजे, अशी शिफारस केली. १९३४ सालीं सरकारनें शुगर केन प्राइस बिल तयार केलें आणि विधिमंडळानें उसाच्या विक्रीची किमान किंमत ठरवून दिली. ह्या कायद्याच्या अंमलबजावणीचें काम प्रांतिक सरकारांवर सोपविण्यांत आलें. संरक्षक जकातीमुळें उपभोक्त्यांवर पडणारा बोजा कालांतरानें अंतर्गत स्पर्धेमुळें कमी होत जाईल, असें फिस्कल कमिशनचें संरक्षक धंद्यांबाबत म्हणणें होतें. साखरेचा किमान दर ठरविणारे कारखानदारांचे संघ प्रबळ झाले, तर हें तत्त्व कितपत व्यवहारांत उतरेल ? किमान दर ठरविणें सर्वच वेळीं वाईट आहे, असें मी म्हणत नाहीं, परंतु असें करण्याची आवश्यकता मध्यवर्ती सरकारास पटवून दिली पाहिजे."

---

### युद्धाचा व्यापारावर परिणाम

युरोपमधील युद्धाचा जगांतील सोन्याच्या साठ्यावर फार परिणाम झाला आहे. अमेरिकेंतील सोनें १० हजार ५५० लक्ष ओल्ड गोल्ड डॉलर्सनी म्हणजे ११ टक्यांनीं वाढलें आहे. तुर्कस्थानमधलील सोनें तिपटीनें वाढलें असून दक्षिण आफ्रिका २४ टक्के, रुमानिया २, व युगोस्लाव्हिया ९ टक्के असें वाढीचें प्रमाण आहे. सप्टेंबरमध्यें बँक ऑफ इंग्लंडमध्यें असलेले ६ हजार ८६० लक्ष ओल्ड गोल्ड डॉलर्सचें सोनें एक्स्चेंज ईक्वलाइझेशन फंडाकडे बदलण्यांत येऊन आज ते कोठेंच दिसत नाहीं. फ्रान्समध्येंही फेब्रुआरीपर्यंत असलेलें १९ हजार लक्ष डॉलर्सचें सोनें मार्चमध्यें ४ हजार १९० लक्ष डॉलर्स इक्वलाइझेशन फंडाकडे गेल्यानें कमी झाले आहे. मार्चपर्यंत बँक ऑफ स्वीडनमधील सोनें निम्यानें कमी झालें आहे. नेदर्लंड्स १०, स्वीत्सर्लंड १२, नार्वे १९, लाटव्हिया २६ व लिथुआनिया १७ टक्के या प्रमाणांत सोनें घटलें आहे. सप्टेंबर १९३९ व मार्च १९४० च्या दरम्यान नोटांची संख्या डेन्मार्क २७, जर्मनी १३, युगोस्लाव्हिया १४, बेल्जम व नार्वे ११, न्यूझीलंड २०, फ्रान्स, तुर्कस्थान व अल्बानिया ८, स्वीडन ७, रुमानिया ४ व अमेरिका २ टक्के या प्रमाणांत वाढली आहे. ईजिप्त, इस्तोनिया, ग्रीस, हंगेरी, ऑस्ट्रेलिया, नेदर्लंड व स्वीत्सर्लंडमध्यें मात्र वरील काळांत ही संख्या घटली आहे.

## अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. व. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ३००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,
POONA CITY.

लेखक—अत्रे.

# अर्धांगी

दिग्दर्शक-विनायक

(वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. चे (खास व्यवस्थेखालील) पुणें मिनर्व्हांत पुणें-फोन ३९८ ८ वा आठवडा

लेखक—आचार्य अत्रे, दिग्दर्शक—विनायक, छायालेखक—पांडुरंग नाईक.

भूमिकाः—विनायक, लीला चिटणीस, मीनाक्षी, साळवी, मालवणकर, सौ. वसिष्ठ, कु. देशपांडे, आणि बाबुराव पेंढारकर

# BHARAT
## Insurance Co., Ltd.

COMPLETES IN 1939

SOLID, SOUND, FRESH BUSINESS of
**OVER RUPEES**
**2 CRORES 8 LAKHS**
UNIVERSALLY RECOGNISED AS
A Leader among Indian Life Offices

*Previous rates of Bonus maintained as a result of the valuation for the quinquennium ended 31st Dec. 1938*

**Rs. 22-8** for Whole-Life Policies

**Rs. 17-8** for Endowment Policies

*Chairman:* SETH RAM KRISHNA DALMIA

*Director-in-Charge:* RAJENDRA KUMAR JAIN

*BRANCHES*

Agra, Ahmedabad, Ajmer, Allahabad, Ambala, Amritsar, Asansol,
Bangalore, Barisal, Bombay, Calcutta, Colombo (Ceylon), Dacca, Debra Dun,
Delhi, Ernakulam, Gauhati, Indore, Jalpaiguri, Jammu, Karachi,
Lahore, Lucknow, Madras, Madura, Multan, Muzaffarpur, Nairobi (E. Africa),
Nagapur, Najibabad, Patna, Peshawar, Poona, Rajmundry, Rangoon (Burma),
Rawalpindi, Secunderabad, Shillong, Sialkot, Sukkur, Surat, Karwar

Head Office: LAHORE

## मुंबईतील हिंदी खिस्ती समाजाची स्थिति

### फावल्या वेळेचा उपयोग

[ ले.:—रे. जे. केलॉक, भाषांतरकार:—रे. जे. रावडे ]

मुंबईमधील खिस्ती लोक आपला फावला वेळ कसा घालवितात हें खाली दिलेल्या पत्रकावरून कळेल. प्रत्येक करमणुकीच्या साधनापुढे शेंकडा किती लोक त्यांचा उपयोग करतात हें दिलें आहे. ही माहिती ६०० कुटुंबांवरून काढली आहे.

| वेळ घालविण्यांचे निरनिराळे मार्ग | शेंकडा |
|---|---|
| वाचनालय ... ... | १० |
| बैठकीचे खेळ ... ... | ६ |
| इतर खेळ ... ... | ७ |
| क्लब ... ... | ७ |
| उपाहार गृह ... ... | १२ |
| सिनेमा ... ... | ३३ |
| गप्पा ... ... | ७० |
| लेंकरांबरोबर खेळ ... ... | ७ |
| गायनवादन ... ... | १ |
| फिरण्यास जाणें ... ... | १० |
| चर्चची कामें ... ... | ६ |
| आवडीच्या इतर गोष्टी ... | ३ |

तपासणी करतांना हें आढळून आलें कीं, लोक फावला वेळ गप्पा करण्यांत विशेष घालवतात. जवळ जवळ $\frac{1}{3}$ लोक सिनेमा पाहाण्यास जातात. तरी पण त्यांच्यापैकी पुष्कळजण नेहमींच जातात असें नाहीं. मजूर लोक विशेषतः दारूचे जास्त शोकी आढळले. ज्या कांहीं आवडीच्या संवयी लोकांना आहेत त्यांचा बहुतेक उपयोग पैसे मिळविण्याकडेच केला जातो. उदाहरणार्थ, एखादा सुतार रोजंदारी तर करतोच, पण फावल्या वेळांत कोणाचें घरांतलें कामही करून देतो व फावल्या वेळेचा स्वतंत्र रीतीनें पैसा मिळविण्याकडे उपयोग करतो. त्याचप्रमाणें सायकलीच्या किंवा ग्रामोफोनच्या दुकानांत काम करणारीं माणसें फावल्या वेळांत ओळखीच्या ठिकाणीं थोडक्या पैशांत काम करून देतात.

| महिन्याचें वेतन | अनाक्षरतेचें शेंकडा प्रमाण |
|---|---|
| कांहींच नाहीं ... ... | ४० |
| — रु. १५ ... ... | ३४ |
| रु. १६ ते रु. २५ ... ... | २८ |
| रु. २६ ते रु. ३५ ... ... | १३ |
| रु. ३६ ते रु. ४५ ... ... | १० |

ज्यांची प्राप्ति रु. ४५ पेक्षा अधिक आहे ते बहुतेक सर्व साक्षर आहेत. साक्षर लोकांपैकी पुष्कळ लोक वाचतां येत असून मुळींच वाचीत नाहींत. शिवाय तपासणी केलेल्यांपैकी ४०० लोक कमीअधिक प्रमाणांत वाचन करतात. असें दिसून येतें कीं, वर्तमानपत्रें विशेष प्रामुख्यानें वाचण्यांत येतात. त्याच्यापाठीं धार्मिक विषयांचा क्रम लागेल. सामाजिक पुस्तकें वाचणाऱ्यांचा तिसरा नंबर लागेल. असें आढळून आलें कीं, कांहीं खिस्ती कुटुंबांत वाचनाची इच्छा असतांनाही साधनांच्या अभावीं त्यांना वाचण्याची संधि मिळत नाहीं. एक तरुण मजूर मराठी ६ वी इयत्ता शिकलेला आम्हांस म्हणाला कीं, मला पुस्तकें मिळालीं तर तीं मी आनंदानें वाचीन.

—"ज्ञानोदय"


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१३,००,००० |

डायरेक्टर्स—सर चुनीलाल मेहता, के. सी. एस्. आय. (अध्यक्ष), श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के., के. टी. ( रजेवर ); मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, के. सी. आय. ई., ओ. बी. ई., मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, मि. आर. एल. फेराई.

मुख्य कचेरी—ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद-स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंघी स्क्वेअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवीवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा $\frac{1}{2}$ टक्का व्याज दिलें जाईल; परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहांमाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

अधिकृत भांडवल.........रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल.........रु. ३,२४,३००
वसूल झालेलें भांडवल...रु. १,६२,१५०

### शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन; श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन; श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रावडे, श्री. व्ही. पी. बर्वे, श्री. एस. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एस. व्ही. भोसले. मॅनेजर.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | १०६—३ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०५—० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ८९—० |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १००—० |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ८८—० |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९३—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १००—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १००—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६१ ) ... ... | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | ११७—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ), ११% ... ... | १३०—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | ९६—० |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ४% ... | ३२—६ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५५५—० |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ९९—० |

### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४३–११—० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६२—९—० |

### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | १२२—६ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २०७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १२२५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४४०—० |

### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९९७—८ |
| सापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७४५—० |

### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | २०९—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४४—८ |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १७–१२ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३४–१४ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ३६००—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | ३०६—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६०६—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३५२—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | १८७२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १०९—८ |


स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या
मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच " कॉमनवेल्थ " ची पॉलिसी घेऊन
कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स
कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासु एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस : ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस : ९९१A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एससी.



स्त्रियांचा आजार म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे यादीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.
किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.
धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.




एजंट:—

**महादेव गोविंद कुलकर्णी**

किराणा व मुसार मालाचे व्यापारी

७८६ सदाशिव, पुणें शहर.

---

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन

**जर्निमन टेलर व्हा.**

मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष

**पराडकर टेलर्स ॲकेडिमी**, ६७२ सदाशिव, पुणें.

---

—ॐ सत्यमेवजयते—

सुकामेवा एक आणा पाकीट

निवडक सर्व किराणा

## लोणच्याचें साहित्य

म्हणजे

मोहरीची डाळ, मोहरी भुकणी, मोहरी तेल ( पॅक बाटल्या ), मेथी भरडा, स्पेशल हिंग, तांबडें लाल ( भडक ) तिखट भुकणी इत्यादि खात्रीचा माल तयार आहे.

लोणच्याचा तयार मसाला पूड तयार आहे !

**—: दत्तात्रय नारायण हेर्जीब :—**

किराणा व सुकामेवा व्यापारी, २० शुक्रवार पेठ, पुणें २

लोणचीं, पापड, मसाले, मेतकूट सदैव तयार असतात.

---

**महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

## तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनी 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.